# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद यवतमाळ

**परिचय** :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. सदर योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अंतर्गत, जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे कार्यालय असुन,या कार्यालयात ग्रामीण भागातील लोकांचा समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा, या दृष्टीने अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

अनुसूचित जाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग , विशेष मागास प्रवर्ग,दिव्यांग निराश्रीत इत्यादींचा सामाजिक, आर्थीक,शैक्षणीक विकास व्हावा हा हेतु समोर ठेवुन तसेच समाजामध्ये महिला, लहान मुले,वयोवृध्द व्यक्ती यांना संरक्षण देण्यात यावे व त्यांचे जीवनमान उंचवावे याकरीता शासन जातीने प्रयत्न करीता असुन,त्याकरीता समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद मार्फत खलील प्रमाणे योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

**1. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :-**

सदर योजना फक्त मुलींसाठी असुन या कार्यालयात अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी आहे. वर्ग 5 वी ते 7 वी करीता प्रती महिना रु.60/- 10 महिण्यां करीता देण्यात येत असुन वर्ग 8 वी ते 10 करीता प्रती महिना रु 100/- 10 महिण्या करीता देण्यात येतात.

**2. अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती योजना**

अस्वच्छ व्यवसायात काम करणारे,अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे,कातडी कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.ही शिष्यवृत्ती सर्व जाती धर्माला लागु आहे.

**3.मॅट्रीकपुर्व भारत सरकार शिष्यवृत्ती योजना**

इयत्ता 9 वी व 10 वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.त्याकरीता विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न हे दोन लाख पन्नास हजाराचे आत असावे.व विद्यार्थी हा अनुसूचित जातीचा असावा.

**4.अनुदानित वसतिगृहे**

समाजातील मागासवर्गीय दुर्बल घटकातील इयत्ता 5-10 इयत्तेत शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी अनुदानित वसतिगृहे स्वयंसेवी संस्थांकडुन चालविल्या जातात. विद्यार्थ्यांना वसतिगृहात जेवन तसेच इतर सुविधा मोफत दिल्या जातात.

**5.आंतरजातीय विवाह योजना :-**

समाजातील जातीय भेदभाव दूर करणे आणि एकात्मतेची भावना जागृत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत, सवर्ण, हिंदू आणि एससी/एसटी/व्हीजे/एनटी यांच्यातील आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी, अस्पृश्यता निर्मूलनाचा एक भाग म्हणून पात्र जोडप्यांना एकूण 50 हजार रुपये देण्यात यतात.


**6.अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना**

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना सन 1974-75 पासुन सुरु करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती व नाबौध्द घटकांच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक अनुसुचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा, गटारे स्वच्छता विषयक सोय, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, समाज मंदीर, इ. पायाभुत व्यवस्था करुन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे.

**7.जिल्हा परिषदेच्या सेस योजना**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत SC,ST,SBC,VJNT या प्रवर्गाच्या नागरिकांसाठी ग्रामीण भागासाठी 20% सेस जीआर नुसार विविध योजना राबविण्यात येत आहेत. जसे की,सायकल, झेरॉक्स मशिन यांसारख्या योजने वर जिल्हा परिषद समाज कल्याण कडून 100% अनुदान देण्यात येते.

# जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ कार्यालयाची रचना



जिल्हा साज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
नागरीकांची सनद तयार करुन प्रसिध्द करणे
शासन परिपत्रक क्रमांक /सकिर्ण -2014/प्र.क्र.56 दि.23 जुलै 2014
नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत.

| अ क्र | सेवेचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी यांचे नाव व हुददा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकारी यांचे नाव व हुददा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | कार्यालय अधिक्षक या पदास अनुसरुन असलेली कामे<br>1.माहिती अधिकारअधियिम 2005अंतर्गत जोडपत्र अ वरील कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे<br>2.माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत प्राप्त जोडपत्र ब वर सुनावणी घेणे बाबतची तारिख घेणे | कार्यालय अधिक्षक कु.के. आर.ईश्वरकर कार्यालयअधिक्षक | नियमा नुसार 30 दिवस दिवसांचे आत | 1.प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>2. माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग अमरावती विभाग अमरावती |
| 2 | 20 टक्के सेस योजना<br>जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत SC,ST,SBC,VJNT या प्रवर्गाच्या नागरिकांसाठी ग्रामीण भागासाठी 20% सेस शासन निर्णया नुसार विविध योजना राबविण्यात येत आहेत. जसे की,सायकल, झेरॉक्स मशिन यांसारख्या योजने वर जिल्हा परिषद समाज कल्याण कडून 100% अनुदान देण्यात येते. | श्रीमती एस.एस.सोळंके समाज कल्याण निरीक्षक | मा. मुख्य्र कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या वेळापत्रका नुसार प्रत्येक आर्थीक वर्षात<br><br>तसेच समाज कल्याण समिती असल्यास समिती मध्ये झालेल्या ठरावा नुसार प्रत्येक आर्थीक वर्षात | मा.मुख्य्र कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ |
| 3 | अनुदानित वसतिगृहे-<br>समाजातील मागासवर्गीय दुर्बल घटकातील इयत्ता 5 वी ते 10 वी इयत्तेत शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी अनुदानित वसतिगृहे स्वयंसेवी संस्थांकडुन चालविल्या जातात. विद्यार्थ्यांना वसतिगृहात जेवन तसेच इतर सुविधा मोफत दिल्या जातात.<br>त्याकरीता अनुदानित वसगृिहांना, इमारतभाडे,मानधन,परिपोषण अनुदान देण्यात येते. | 1.श्री.सचिन महल्ले समाज कल्याण निरीक्षक<br>2. श्रीमती एस.एस. मलोंडे समाज कल्याण निरीक्षक<br>3.श्री.पी.व्ही. मोपारी समाज कल्याण निरीक्षक | प्राप्त तरतुदी नुसार | मा.मुख्य्र कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ |
| 4 | शिष्यवृती योजना<br>1.मॅट्रीकपुर्व भा.स.शि.योजना<br>2.गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, | 1. श्रीमती एस.एस. मलोंडे समाज कल्याण | प्राप्त तरतुदी नुसार व वरिष्ठ कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या | मा.मुख्य्र कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 3. सावित्री बाई फुले शिष्यवृत्ती योजना,<br>4.अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती<br>5. गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना<br>6.शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क | निरीक्षक<br>2.श्री.मंगेश केशववार<br>वरिष्ठ लिपीक<br>3.श्रीमती पी.एच. ढोकणे<br>कनिष्ठ लपीक | निर्देशा नुसार (ऑफलाईन किंवा ऑनलाईन पध्दतीने दर वर्षी ) | |
| 5 | आंतर जातिय विवाह योजना<br>पी.एफ.एम एस. प्रणालीव्दारे प्राप्त तरतुदी नुसार दाम्पत्यांच्या संयुक्त खात्यात रु. 50000/-अदा केले जाते | 1.श्री.मंगेश केशववार<br>वरिष्ठ लपीक | प्राप्त तरतुदी नुसार | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ |
| 6 | अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना<br>-अनुसूचित जाती व नाबौध्द घटकांच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक अनुसुचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा, गटारे स्वच्छता विषयक सोय, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, समाज मंदीर, इ. पायाभुत व्यवस्था करुन त्यांचा सर्वागीण विकास करणे | श्री.पी.व्ही.मोपारी समाज कल्याण निरीक्षक | प्राप्त तरतुदी नुसार | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ |
| 7 | **महाराष्ट्राचे व्यसनमुक्ती धोरण-**<br>1.व्यसनमुक्ती संबंधी काम करणाऱ्या संस्था व केंद्रे यांना दरवर्षी प्रत्येकी रु.1100000/- एवढे **प्रोत्साहानात्मक अनुदान** देण्यात येते.<br><br>2.व्यसनमुक्ती क्षेत्रात मौलीक कार्य करणाऱ्या आदर्श सेवकांना व संस्थांना गांधी जयंती सप्ताहाच्या निमीत्ताने व व्यसनमुक्ती प्रचार कार्य या मोहीमेचा एक भाग म्हणुन **पुरस्काने सन्मानित करण्यात येते** . | श्रीमती एम.डी.व्यास समाज कल्याण निरीक्षक | शासन निर्णयामध्ये वेळापत्रक नमुद आहे.<br>परंतु<br>**मा. आयुक्त कार्यालय यांचे आदेश प्राप्त झाल्या नंतर प्रस्ताव मागविल्या जातात** | ----- |